# झिजलेले खुबे (ए.व्ही.एन.) आणि त्यावरील होमिओपॅथिक उपचार




ए.व्ही.एन. Avascular Necrosis म्हणजे रक्तपुरवठ्याच्या अभावी पेशी मृत पावणे. हा आजार हिप जॉईंटमध्ये ३० ते ५० वर्षे वयोगटातील व्यक्तींमध्ये अस्थिपेशींच्या ऱ्हासामुळे उद्‌भवतो. या आजाराची सुरुवात नकळत पण हळूहळू होते आणि हा योग्य त्या उपचारांअभावी दिवसेंदिवस वाढतच जातो.

निरोगी व्यक्तीच्या शरीरात दुखापतीनंतर पुन्हा नवीन अस्थिपेशींची निर्मिती होऊन नवीन हाडाची निर्मिती होते. हाड ढासळणे आणि पुन्हा निर्मिती होण्याची ही प्रक्रिया निरोगी शरीरात सतत चालू असते. जुनाट हाडाची जागा नवीन सशक्त हाडाने पुन्हा भरून काढली जाते. त्यामुळे अस्थिसंस्था आणि शरीराचा सांगाडा मजबूत राहण्यास मदत मिळते. तसेच शरीरातील खनिज द्रव्यांचे संतुलन टिकवून ठेवले जाते. परंतु, अव्हॅस्कयुलर नेक्रॉसिस या आजारामध्ये रक्तपुरवठ्याच्या कमतरतेमुळे अस्थिपेशी मृत पावण्याचा वेग अस्थिपेशीनिर्मितीपेक्षा जास्त असतो. परिणामी हाड कमकुवत होऊन होतो आणि सांध्यांचा परिपृष्ठ ढासळतो. ज्यामुळे अस्थिदाह निर्माण होऊन वेदना होतात आणि सांध्यांच्या हालचालींमध्ये अक्षमता निर्माण होते.

**लक्षणे :-** हा आजार मोठ्या हाडांच्या शेवटच्या टोकांना होतो. यामध्ये मांडीचे हाड (फिमर), हाताचे हाड (ह्युमेरस) आणि जबड्याच्या हाडाचा समावेश होतो. एकावेळी एकच किंवा अनेक हाडांना त्रास होऊ शकतो.

**वर्गीकरण :-** स्टेज ० - रुग्णाला काहीच तक्रारी होत नाहीत. पेशीअभ्यासात अस्थिऊती मृत्यू पावलेल्या दिसतात. एक्स रे नॉर्मल असतो.

**स्टेज १ -** थोड्या प्रमाणात वेदना जाणवतात. एमआरआय व बोन स्कॅनमध्ये अष्ठची लक्षणे दिसून येतात.

**स्टेज २ -** रुग्णाला जास्त प्रमाणात वेदना सुरू होतात. अस्थिऊतींची कमतरता तसेच सिस्ट जाणवून येतात. एमआरआयमध्ये आजाराचे अचूक निदान होते.

**स्टेज ३ -** तीव्र वेदना होतात. हाडाभोवती चंद्रकोरीचा आकार हाड ढासळल्यामुळे दिसून येतो. खुब्यातील हाडाचा आकार तरीसुद्धा बिघडलेला नसतो.

**स्टेज ४ -** खुब्यातील हाडाचा आकार बदलतो. सांध्यांमधील पोकळी कमी होते. हाडाचा पृष्ठभाग १५ ते ३० टक्के खराब होतो.

**स्टेज ५ -** सांध्यातील पोकळी अजून निरुंद होते. सांध्यातील हाडांचा अस्थिदाह होऊन घट्टपणा येतो. त्यामुळे सांध्यांची रचना बदलते. परिणामी मांडीतील हाडाचा नितंबाशी असलेला कोन बिघडतो आणि रुग्णाला चालताना, बसताना त्रास होतो.

**स्टेज ६ -** खुब्यातील हाड जास्त ढासळते. परिणामी संपूर्ण सांध्यांत कार्यात्मक आणि रचनात्मक बदल होतात.

**कारणे:-** अनेक कारणे या आजारासाठी गृहीत धरण्यात येतात. जसे की, मद्यपान, अपघात किंवा दुखापतीनंतर उद्‌भवणारा त्रास, उच्चरक्तदाब, धमन्यांतील दाह, रक्तवाहिन्यांचे, एसएलईचे आजार ज्यामुळे रक्तातील गुठळी होऊन सांध्यात रक्तपुरवठा बंद होणे, सिकलसेल अलेमिआ, किमोथेरपी किंवा रेडिओथेरपी किंवा जास्त प्रमाणात स्टिरॉइड वेदनाशामक औषधे व दीर्घकालीन प्रतिजैविकांच्या वापरामुळे ए.व्ही.एन. सुरू होतो.

**निदान :-** एक्स रे किंवा एमआरआय, बोन स्कॅनवरून या आजाराचे निदान तसेच वर्गीकरण होते. हा आजार स्टेज २ किंवा स्टेज ३ मध्ये लक्षात येतो. त्यामुळे उशिरा उपचार सुरू होऊन शेवटी कृत्रिम सांध्यांचे प्रत्यारोपण सल्ला दिला जातो.

**केस :-** ही एका ३२ वर्षांच्या महिलेची केस आहे. ज्यांना उजव्या खुब्याला अष्ठचा त्रास सुरू झाला होता. त्रास सुरू होण्याच्या एक वर्षाआधी त्या पडल्या. त्यानंतर त्यांना हळूहळू चालताना वेदना सुरू झाल्या. हळूहळू वेदना असह्य होऊ लागल्यामुळे उजव्या खुब्याची शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यानंतर सहा महिन्यांतच डाव्या खुब्याला त्रास चालू झाला.

**तक्रारी :-** १. डावा खुबा दुखणे ४ वर्षांपासून - सतत ठणक बसल्यासारख्या वेदना होणे. शारीरिक कष्टानंतर, थंड वाऱ्यामुळे, जिना चढताना, रात्रीच्या वेळी, पाळीच्या आधी, पुढे झुकल्यावर लक्षणांमध्ये वृद्धी, गरम पाण्याने शेकल्यावर, डाव्या बाजूला झोपल्यावर बरे वाटणे. २. जुनाट कंबरदुखीचा त्रास - पाळीच्या आधी, कष्टानंतर, कंबर दुखणे, पाळीनंतर बरे वाटणे. ३. तळव्यांची आग होणे - रात्रीच्या वेळी, उभं राहिल्यावर तळव्यांची आग होणे. ४. सतत पडसाकडला होणे - दिवसांतून ४ ते ५ वेळा जेवणानंतर कळ मारून संडासला होणे.

विशेष माहिती :- १. भूक सहन न होणे. २. खाण्यात तिखट पदार्थांची आवड. ३. पोटऱ्यांना गोळे येणे. ४. जेवताना चेहऱ्यावर घाम येणे. ५. मासिक पाळीच्या वेळी घाणेरडा वास येणारा जास्त प्रमाणातील रक्तस्राव. ६. थंड प्रकृती.

**स्वभाव :- तुमच्या लहानपणाविषयी सांगा.**

माझं लहानपण खेडेगावात गेलं. लहानपणी माझा स्वभाव खूप भित्रा होता. घरात आजी-आजोबांचा दरारा असायचा. त्यामुळे मी कायम घाबरून राहायचे. अबोल असायचे. आई-वडिलांनी खेळायला जायला मनाई केली तर मला खूप राग यायचा. पण, मी एकटीच कोपऱ्यात जाऊन बसत असे. मला परीक्षेची, अंधाराची, एकटं राहण्याची भीती वाटायची.

**तुमच्या ताणतणावांविषयी सांगा.**

माझे लग्न वयाच्या २५ व्या वर्षी झाले. आम्ही सगळे एकत्र कुटुंबात राहतो. सुरुवातीला सगळं चांगलं होतं; परंतु नंतर माझ्या दुखापतीनंतर मला जो त्रास चालू झाला, त्यानंतर जावेबरोबर माझं भांडण होऊ लागले. तिच्याकडून होणारा सततचा अपमान आणि कामामधील अकार्यक्षमता यामुळे घरातील वाद वाढू लागला. त्यामुळे माझी खूप चिडचिड होते. कधी कधी त्रासामुळे मला आत्महत्येचे विचार येतात. सध्या आम्ही या सततच्या भांडणांमुळे विभक्त होण्याच्या विचारात आहोत.

**संपूर्ण व्यक्तिमत्त्व :-** १. चिडचिडपणा २. दबला गेलेला राग ३. तीव्र वेदना रात्रीच्या वेळी, पाळीच्या आधी, चालताना होणे. ४. दाबल्यानंतर, शरीरस्रावानंतर बरे वाटणे. ५. ठणकल्यासारख्या वेदना होणे. ६. डाव्या बाजूच्या तक्रारी. ७. खाण्यात तिखट पदार्थांची आवड. ८. जास्त वेळा संडासला जावे लागणे. ९. जास्त वेळ रक्तस्राव मासिक पाळीच्या वेळी होणे. १०. दुखापतीनंतर लक्षणांना सुरुवात ११. थंड प्रकृती.

**प्रतिसाद :-** वरील लक्षणांवरून मी त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करून एकाच होमिओपॅथिक औषधाची मात्रा चालू केली. १५ दिवसांनंतर हळूहळू वेदना कमी होऊ लागल्या. रुग्णाला मांडी घालणे, दोन पायांवर बसणे, वाकणे या हालचालींमध्येही फरक जाणवू लागला. राउंडच्या वेळी मला बोलावून घेतले आणि चक्क माझ्यासमोर कॉटवर मांडी ठोकली. पुन्हा झटकन उठल्या आणि पुन्हा मांडी घातली. त्यांच्या हालचालीत लवचिकता, सहजता होती. पायातल्या वेदना केव्हाच नाहीशा झाल्या होत्या. दोन्ही खुब्यांचे ऑपरेशन वाचवण्यात होमिओपॅथी यशस्वी ठरली.

आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल,
तपोवन मंदिर रोड, मोर मॉलच्या समोर,
पिंपरी गाव, पुणे -१७
फोन नंबर - ०२०-२७४१२१९७/२७४१२५४९

## संक्षिप्त

### डेंग्यूच्या निदानासाठी नऊ सेंटिनल केंद्रे

**। पुणे : प्रतिनिधी**

वाढत्या डेंग्यूला आळा घालण्यासाठी राज्यात डेंग्यू विषाणूजन्य तापाच्या निदानासाठी नऊ सेंटिनल केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. यापूर्वीच २६ सेंटिनल सेंटर्स आणि राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था (एनआयव्ही) येथेही तपासणी करण्यात येत आहे. परतीच्या पावसाने बऱ्यापैकी हजेरी लावली, पाऊस उघडल्यानंतर मात्र अनेक भागांत डेंग्यूचा उद्रेक झाला. हा उद्रेक नियंत्रणात आणण्यासाठी आरोग्य विभागाने जिल्हा पातळीवर शीघ्र प्रतिसाद पथके कार्यरत केली आहेत. त्यामध्ये तज्ज्ञ मनुष्यबळ आणि आवश्यक औषधेही उपलब्ध करून दिली आहेत. डेंग्यू रोखण्यासाठी महापालिकांनी विशेष लक्ष देण्याच्या सूचना आरोग्य विभागाने महापालिकांना दिल्या असून, मार्गदर्शक सूचनाही केल्या आहेत.

## नोव्हेंबरपासून बालकांना पाच आजारांसाठी एकच लस

**। पुणे : प्रतिनिधी**

जन्म झाल्यानंतर बाळ एक वर्षाचे होईपर्यंत होणारे विविध आजार व रोगांना प्रतिबंध करण्यासाठी बालकास तीन वेळा डोस देण्यासाठी सहा वेळा इंजेक्शनची सुई टोचावी लागत होती. आता मात्र पाच रोगप्रतिबंधकांचा समावेश असलेली 'पेंटावॅलंट' एकच लस देण्यात येणार आहे. ही लस येत्या नोव्हेंबरपासून देण्यात येणार आहे.

या लसीत पूर्वीच्या चार ऐवजी पाच रोगप्रतिबंधकांचा समावेश असणार आहे. पूर्वीच्या डोसेसमध्ये घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात, तसेच हिपॅटायटिस बी या आजारांच्या रोगप्रतिबंधक लसींचा समावेश होता. त्यात आता हिमोफिलस इन्फ्लुएंझा टाइप बी या आजाराच्या प्रतिबंधक लसीचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. येत्या नोव्हेंबरपासून पेंटावॅलंट लस मोफतपणे प्रत्येक बालकाला दिली जाईल. राज्यात दर महिन्यात पावणेदोन लाख बालकांना ही लस देण्यात येणार आहे.



आत्तापर्यंत नवजात बालकास ट्रिपल डोस आणि हेपिटायटीस बी अशी स्वतंत्र लस दिली जात होती. शास्त्रज्ञांच्या मदतीने पाच रोगांवर प्रतिबंधक एकच लस (पेंटावॅलंट लस) बाळांना दिली जाणार असल्याने त्यांचे रडणे कमी झाले आहे. राज्य आरोग्य विभागाने याची प्रभावी जनजागृती करण्याचे आवाहन सर्व आरोग्य संस्था, रुग्णालय व स्थानिक स्वराज्य संस्थांना केले आहे. या नवीन पेंटावॅलंट लसविषयी मातांना नेमकेपणाने माहिती द्यावी. या माध्यमातून लसीकरणाचे महत्त्व अधोरेखित करून लसीकरणाचे प्रमाण १०० टक्के होण्यासाठी सार्वत्रिक प्रयत्न करणे गरजेचे आहे.

बालमृत्यूदर कमी करण्यासाठी आरोग्य कर्मचारी, आशा, अंगणवाडी कार्यकर्ती व मातांना याविषयी माहिती देऊन जनजागृती करण्याचे आवाहन राज्य आरोग्य विभागाने केले आहे. धनुर्वात, डांग्या खोकला, घटसर्प, हेपिटायटीस बी आणि हिब या आजारांपासून संरक्षण करणारी पेंटावॅलंट लस नोव्हेंबर महिन्यात दिली जाणार आहे.

## विद्यार्थिनींसाठी डेंग्यूविषयक जागृती मोहीम

**। पुणे : प्रतिनिधी**

'महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटी'च्या अँग्लो उर्दू गर्ल्स हायस्कूलमध्ये डेंग्यूविषयक जागृती मोहीम आयोजित करण्यात आली होती. डेंग्यूचा संसर्ग रोखण्यासाठी स्वच्छतेबाबतीत कोणती काळजी घ्यावी याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या मोहिमेंतर्गत कीटकनाशकांची फवारणी करण्यात आली. शाळेच्या विद्यार्थिनींच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी ही कीटकनाशक फवारणी करण्यात आल्याचे शाळेच्या मुख्याध्यापिका आयेशा शेख यांनी सांगितले. या मोहिमेत पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डातील खांडरे, दरोडे, तसेच नगरसेवक गायकवाड यांनी सहकार्य केले.

## कॉम्प्युटर व्हिजन सिंड्रोमच्या रुग्णांमध्ये वाढ

**। पुणे : प्रतिनिधी**

आयटी हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात आता कॉम्प्युटर व्हिजन सिंड्रोम नावाच्या एका नवीनच त्रासाला तोंड द्यावे लागत आहे. संगणकाच्या वाढत्या वापराबरोबरच तोही वेगाने वाढत आहे. कित्येक तास सलग संगणकासमोर काम करणाऱ्या तंत्रज्ञान-सॅव्ही तरुणाईला या आजाराने ग्रासले असून, पुसट दृष्टी, कोरडेपणा आणि प्रतिमांवर दृष्टिकेंद्रित करण्यात येणाऱ्या अडचणी अशा तक्रारींमध्ये आता वाढ झाल्याचे निरीक्षण वैद्यकीय तज्ज्ञांनी नोंदविले.

मेंदूला प्राप्त होणाऱ्या माहितीपैकी ८० टक्के माहिती ही डोळ्यांमार्फत मिळते त्यामुळे डोळ्यांची निगा राखणे महत्त्वाचे आहे. स्क्रीनकडे दीर्घकाळ बघत बसल्यामुळे कायमस्वरूपी इजा होते, असे अद्याप विज्ञानाने सिद्ध झालेले नाही. बाहेर पडणाऱ्या तीक्ष्ण प्रकाशामुळे डोळ्यांवर ताण येतो. स्क्रीनवर दीर्घकाळ काम करणाऱ्या व्यक्तींना डोळ्यांची उघडझाप पुरेशा प्रमाणात होत नाही. प्रत्येकवेळी डोळे बंद करताना डोळ्यांवर अश्रूचा पातळ थर पसरवला जात असतो. अश्रूचा थर पसरवण्याची क्रिया पुरेशी होत नाही आणि डोळे कोरडे पडतात. कॉम्प्युटर व्हिजन सिंड्रोमबद्दल माहिती देताना मेडिलेसर कॅटरॅक्ट अँड लेसर सेंटरचे संचालक डॉ. संजय सावरकर यांनी ही माहिती दिली.

डोळ्यांची उघडझाप करण्याचे प्रमाण सामान्य स्थितीत एका मिनिटाला २२ वेळा एवढे असते. पुस्तक वाचताना हे प्रमाण मिनिटाला दहा, तर संगणकावर काम करताना मिनिटाला सातवेळा एवढे कमी होते. त्याचबरोबर वातानुकूलित यंत्रणेखाली सतत बसल्यामुळे, कार्यालयातील धुळीमुळेही डोळ्यांवर परिणाम होतो. डोळ्यांची आग होणे, पाणी येणे डोळे कोरडे पडणे अशी लक्षणे आढळल्यास, काम करताना स्क्रीन आणि डोळ्यांतील अंतर, तसेच बसण्याच्या पद्धतीबद्दल डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असेही डॉ. सावरकर यांनी सांगितले.

## आपलं व्यासपीठ

### लबाडाघरचं आवतण



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ पुण्यातही होणार असल्याचे आणखी एक आश्वासन पुणेकरांच्या पदरात पडले आहे. यासंबंधी १९७८ मध्ये विधीमंडळात मंजूर झालेल्या ठरावाची अंमलबजावणी अद्याप होऊ नये, ही एकाच वेळेस आश्चर्याची व दुर्दैवाची बाब आहे. मुंबई उच्च न्यायालयात पुण्यातूनच ४० टक्क्यांहून अधिक केसेस दाखल होतात. खंडपीठाचा लाभ पुणे जिल्ह्यातील पक्षकारांना होणार असल्याने याबाबत पुणे बार असोसिएशनची आग्रही मागणी योग्य आहे. कायदेशीर व न्याय्य हक्कांसाठी पुणेकरांना गेली ३६ वर्षे संघर्ष करायला भाग पाडणे शासन व न्यायव्यवस्थेस शोभा देणारे नाही. 'लबाडाघरचं आवताण जेवल्याबिगर खरं न्हाई' असं म्हटलं जातं. तेव्हा पोकळ आश्वासने, गुळमुळीत शिफारशी, निर्जिव निवेदने, शिष्टमंडळांच्या निरर्थक भेटीगाठी ही नाटकं फार आणि पुरे झाली. वस्तुस्थिती लक्षात घेऊन आता थेट कृतीच व्हावी, ही अपेक्षा!

**- राजेश बेल्हेकर, महर्षीनगर, पुणे.**

**टीप :** आपल्या परिसरातील समस्यांबाबत आपली मते १०० ते १५० शब्दांत आपल्या छायाचित्रासह व पत्त्यासह खालील पत्त्यावर पाठवावीत.

पत्ता : दैनिक 'पुण्य नगरी' बहिरट पाटील आर्केड, दुसरा मजला, बालगंधर्व चौक, शिवाजीनगर, पुणे - ५. Email : ambika.pune@gmail.com

## लक्झरी बसेस तात्पुरत्या सुसाट

**। पुणे :** ऑल इंडिया मोटर ट्रान्स्पोर्ट असोसिएशनने केंद्र सरकारशी केलेल्या चर्चेनंतर लक्झरी व सर्व प्रकारच्या बस, तसेच साडेतीन टनाच्या टेम्पोला स्पीड गव्हर्नन्समधून वगळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्र शासनाने एक ऑक्टोबरपासून व्यावसायिक वाहनांना स्पीड गव्हर्नन्स बंधनकारक केले होते.

अपघात रोखण्यासाठी केंद्रीय परिवहन विभागाने एक ऑक्टोबरपासून व्यावसायिक वाहनांना प्रतितास ६० किलोमीटर वेग असे बंधन घातले होते. यासाठी व्यावसायिक वाहनांची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांनाच वाहनांना स्पीड गव्हर्नन्स बसविण्याचे बंधन केले आहे. संघटनेने यासंदर्भात बाजू मांडताना सांगितले, लक्झरी बसची किंमत ८० लाख ते एक कोटीपर्यंत असते. प्रवासी लवकर पोहोचले तरच खासगी बसचे व्यावसायिक उद्दिष्ट सफल होते.

वेगावर प्रतितास ६० किलोमीटरचे बंधन घातल्यास प्रवासाचा वेळ वाढेल. लक्झरी गाड्यांना नियंत्रणासाठी चांगली यंत्रणा असते, तसेच देशातील अनेक महामार्ग चांगल्या दर्जाचे आहेत. यामुळे स्पीड गव्हर्नरचे बंधन नको, अशी मागणी करण्यात आली होती. सध्या केंद्र सरकारने एप्रिलपर्यंत हे बंधन काढले आहे. सरकारने एक अध्यादेश काढून एप्रिल २०१६ पर्यंत या बंधनातून बस व टेम्पोला वगळल्याचे जाहीर केले आहे, असे संघटनेचे बाबा शिंदे यांनी सांगितले.

छोटे अंग निराश का
जपानी पट्टीनुमा Vaccum Therapy
अंगाचा आकार आणि सेक्स पावरमध्ये वाढ शक्य
FDA चेसुद्धा मानने आहे की VACCUM THERAPY आणि आयुर्वेदिक औषधींद्वारा तुम्ही तुमच्या अंगाच्या आकारात वाढ करून सेक्स क्षमता वाढवू शकता. शीघ्रपतन, नपुंसकता, अंगाचा लहाणपणा, पातळपणा, वाकडेपणा दूर करून सुडौल आणि मनासारखा सेक्स टाईम मिळवू शकता. ३० दिवसाच्या औषधीसोबत १६ जीबी मेमरी कार्ड मोफत. NO SIDE EFFECT
09178726578
09090549912

जगातील सर्वश्रेष्ठ
सिकंदरे आज़म
भारतात सेक्स पावर कॅप्सूल उपलब्ध
नविन विश्वास, एकाच कॅप्सूलने इंद्रियात अविश्वसनीय वाढ व स्फुर्ती नसांची खराबी, शीघ्रपतन, स्वप्न दोष, नपुंसकता दूर करा. मनासारखा सेक्स टाईम मेडीकल स्टोअरमधून खरेदी करा वा फोन करा.
09212358677
09311303434



विवाहित पुरूषांमध्ये कमजोरी ?
विवाहित पुरूषांमध्ये कमजोरी तणाव, लहानपणीच्या वाईट सवयची कमजोरी (unbalanced diet) असमतोल आहारामुळे, ही सर्व कारणे कारणीभूत असू शकतात जे तुमच्या जीवनात उत्साहाचे क्षण हिरावून घेतात ज्या मुळे आत्मविश्वास कमी होणे, उदासीनता येणे, सतत थकवा जाणवणे, सर्वांगिण दौर्बल्य निर्माण होऊ शकतात. आयुर्वेदात सर्वांगिण दौर्बल्यनाशक व सप्तधातु-पोषक काही विशेष औषधांचे वर्णन आढळते. या औषधांचा विशिष्ठ शोधन व संस्कार प्रक्रिया करुन आयुरेक्स-एस कॅप्सुलची निर्मिती नर्चर हेल्थ केअरने केली आहे.





आयुरेक्स-एस
कॅप्सुल
सर्व मेडिकल स्टोर्स मध्ये उपलब्ध.
NURTURE
DIFFERENCE GURANTED !!
Medicine & its dose should be taken under medical supervision only
दमदार पावरफुल आयुरेक्स तेल स्वरुपात सुद्धा उपलब्ध.

Proprietor Sunil Chandak
Govt Reg.No.7342
+पेन केअर सेंटर+
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अ.नगर
खालील व्याधी (आजारावर) सल्ला व उपचार
सांधेवात, गुडघेदुखी
मान, पाठ, कंबरदुखी
मायग्रेन (डोकेदुखी)
फ्रोझन शोल्डर (खांदेदुखी)
सायटीका, स्लिप डिस्क
टाचदुखी, टेनिस एल्बो
हातापायात मुंग्या येणे



पुणे - जंगली महाराज रोड, हॉटेल शुभमच्या पाठीमागे, दुर्गाशंकर बिल्डींग (कृपया अपॉईंटमेंट घेऊनच येणे) महिन्यातुन अल्टरनेट दोन रविवार सकाळी ८ ते ३ मो. 9420808990, 9403354523, 9822899660

विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी
सेक्स तज्ञांचा सल्ला व आयुर्वेदिक औषधी उपलब्ध



हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष,
शिघ्रपतन, शिथिलता,
हायपोगोनॅडिझममुळे लहान लिंग,
मधुमेहामुळे आलेली लैंगिक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : विर्यामध्ये शुक्रजंतुची संख्या कमी असणे.
अॅझुस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.
आशाकिरण क्लिनीक
गुलाब पॅव्हेलीयन, दुसरा मजला, डेक्कन बस स्टॉपच्या मागे, डेक्कन, पुणे. वेळ - ११ ते ६ पर्यंत.
7875451644, 8657122333
औषधीसाठी. संपर्क - 7769856821